# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक ६-०८-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक ०६ ऑगस्ट २०१८ रोजी (का.प.क्र.१७) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-५० वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगरसचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २०. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २१. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २२. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २३. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २४. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २५. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २६. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २७. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २८. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३०. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३१. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३५. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३६. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३७. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३८. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३९. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४०. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४१. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४२. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५१. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५२. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५३. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५५. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५६. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५७. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ५८. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५९. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६०. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६१. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६२. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६३. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६४. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६५. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |

| | |
|---|---|
| ६६. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६७. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६८. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६९. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७०. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७१. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७२. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७३. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७४. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७५. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७६. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७७. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७८. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७९. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८०. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८१. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८२. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८३. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८४. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८५. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८६. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८७. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८८. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८९. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९०. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९१. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.भाऊसाहेब जगताप:राज्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळावे. यासाठी १८ तरूणाने बलिदान दिले. मुकूंदवाडी येथील ज्ञानेश्वर कॉलनी येथील श्री.प्रमोद होरे तसेच चौधरी कॉलनी येथील श्री.उमेश ईडाईत यांनी सुध्दा मराठा आरक्षण मिळण्यासाठी आपला जीव गमावला. या दोघांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.विकास जैन :यास अनुमोदन आहे.

श्री.कमलाकर जगताप :श्री.प्रमोद होरे यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी आपला जीव गमावला. या दोघांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री दिलीप थोरात :स.सदस्या श्रीमती जयश्री कुलकर्णी यांच्या मातोश्री विजयाताई बेलदे यांचे निधन झाले. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे श्रध्दांजली अर्पण करणेसाठी उभे रहावे.

या वेळी स्व.प्रमोद होरे व स्व.उमेश ईडाईत तसेच स्व.विजयाताई बेलदे यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी स.श्री.राजू शिंदे, श्री.दिलीप थोरात तसेच उपअभियंता श्री.के.डी.देशमुख यांना त्यांचे वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विरोधी पक्ष नेते पदी श्री.जमीर कादरी यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.

श्री.गंगाधर ढगे :महापालिकेच्या कार्यालया समोरील चौकात हायमास्ट लाईट लावावे. ती संचिका मंजूर आहे. वर्क ऑर्डरसाठी थांबलेली आहे.

मा.महापौर :तातडीने कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.दिपक जावळे यांची महाराष्ट्र राज्य दिव्यांग क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी निवड झाली तसेच दुसरे कर्मचारी श्री.विजय काकडे यांची ही त्या संघामध्ये नियुक्ती झाली आहे. सभागृहाच्या वतीने या दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करण्यात यावे. दिव्यांगाच्या माध्यमातून त्यांचा जो निधी आहे ३ टक्केहून ५ टक्के शासनाच्या आदेशानुसार जी.आर.सुध्दा प्राप्त झालेला आहे. पण जे-जे खेळाडू महानगरपालिकेचे आहेत त्यांच्यासाठी जे-जे साहित्य लागेल त्यासाठी एक विशेष निधी म्हणून महापालिकेच्या माध्यमातुन पुरवले पाहिजे असा ठराव मांडत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :राज्यातील १६ खेळाडूंना डायरेक्ट नोकरीवर घेण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन करावे. शिवछत्रपती पुरस्कार विजेते यांचा मनपाच्या वतीने सत्कार करावा.

मा.महापौर :जागतिक क्रिडा दिनी शहरातील सर्व खेळाडूंचे सत्कार करण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :सांगली-जळगाव मनपाच्या निवडणूकीत भाजपा पक्षाला यश आले आहे. त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय व मा.श्री.रावसाहेबजी दानवे यांचे अभिनंदन करावे.

श्री.जमीर कादरी :कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यास मा.महापौर, मा.आयुक्त यांनी चांगले प्रयत्न केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याचा ठराव घ्यावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :जो श्री.तुपे यांनी ठराव मांडला त्यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :माजी महापौर स.सदस्य श्री.त्र्यंबक तुपे यांनी महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.दिपक जावळे यांनी क्रिडा क्षेत्रात चांगले काम केले असतांना महाराष्ट्र राज्यातील दिव्यांग क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी श्री.दिपक जावळे यांची नियुक्ती झाली तसेच त्यांच्या सोबत श्री.विजय काकडे यांची सुध्दा त्या संघामध्ये नियुक्ती झाली आहे. या दोघांचे अभिनंदन करत असतांना श्री.त्र्यंबक तुपे यांनी एक सुचना केली की, दिव्यांगाचा जो निधी आहे तो शासन परिपत्रकानुसार ५% पर्यंत स्थानिक संस्थांना वाढवता येऊ शकतो अभिनंदनाचा ठराव मंजुर करत असतांना प्रशासनाला आदेश/सुचना करण्यात येते की, मा.पालकमंत्री साहेबांकडे एक ठराव पाठवला होता की, दिव्यांगाकरीता एक

मैदान त्याचा सर्वांगीन विकास नाविन्यपूर्ण योजनेतुन डी.पी.डी.सी.मधुन द्यावा तसा ठराव मा.आमदार, श्री.दिपक सावंत, मा.पालकमंत्री महोदयांकडे पाठवलेला आहे. त्या अनुषंगाने या ठिकाणी निर्णय अपेक्षित आहे. श्री.मकरंद कुलकर्णी, गटनेता यांच्या वॉर्डामध्ये स्व.मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचे उद्यान आणि सिध्दार्थ उद्यान या ठिकाणी दोन-दोन कोटी रुपये मागणी करण्याचा प्रस्ताव पाठवलेला आहे. लवकरच त्याबाबत निर्णय अपेक्षित असतांना महानगरपालिकेचा निधी तात्काळ नियोजन करणेबाबत या विभागाचे विभाग प्रमुख यांना सुचना आदेश देण्यात येत आहेत. तसेच साहित्याच्या बाबतीत श्री.जावळे, श्री.काकडे आणि इतर ही खेळाडु असतील त्यांनी मागणी केल्यानुसार विविध क्रिडा साहित्यांच्या बाबतीत सुध्दा प्रशासनाने त्यांना महानगरपालिकेच्या निधीतून मागणी केल्यानुसार खेळाचे साहित्य देण्याचा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

मा.महापौर :महापालिकेच्या वर्धापन दिना निमित्ताने चांगले कार्यक्रम घेण्यात यावेत. महिलांसाठी कार्यक्रम घ्यावेत.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रत्येक वॉर्डात महिलांसाठी वाचनालय असावे. काही ठिकाणी जागा नसतील तर तेथे नाममात्र भाड्याने घेऊन कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्त यांची सचिव पदी प्रमोशन झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. त्यांनी कचरा, पाण्याची समस्या सोडवण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. हा प्रश्न पुर्णत: मार्गी लागावा त्यानंतर त्यांना येथून कार्यमूक्त करावे.

श्री.विकास जैन :गेल्या दीड महिन्यात मा.आयुक्तांनी यांनी चांगले काम केले आहे. कचऱ्याचा प्रश्न टेंडर काढून प्रश्न निकाली काढलेले आहे. त्याबद्दल अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर :मा.आयुक्त यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. तसेच श्री.स्वप्नील तांगडे यांची थेट नियुक्ती क्रिडा क्षेत्रातून झाली. त्यांचेही अभिनंदन तसेच सांगली-जळगाव मनपात भाजपा पक्षाला यश प्राप्त झाले. त्या पक्षाचे प्रमुख यांचे अभिनंदन करण्यात येते. मनपाच्या विरोधी पक्षनेते पदी श्री.जमीर कादरी यांची नव्याने नियुक्ती झाली यांचेही अभिनंदन करण्यात येते. महिलांसाठी शौचालय बांधण्यात यावे. सीएसआरच्या माध्यमातून कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :हर्सुल टी पॉईन्ट, गजानननगर भागात शौचालयाजवळ अतिक्रमण झाले ते काढले जात नाही. तसेच शौचालय बांधण्याचे आदेशीत केले होते ते काम केले नाही.

श्रीमती माधुरी देशमुख :पैठणगेट येथे मी व्हिजीट दिली होती. तेथे काम होत नाही. या शौचालयासाठी आमदार श्री.सिरसाठ व मा.श्री.सावे साहेब निधी देण्यास तयार आहे. त्यांनी असे म्हटले की, जागा सांगावी निधी देण्यास तयार आहे.

मा.महापौर :उपआयुक्त श्रीमती मुथा मॅडम व श्रीमती पाडळकर मॅडम यांनी महिला सदस्यां सोबत पाहणी करावी. पैठणगेट येथील शौचालयाचे काम सुरू करावे. जेथे अतिक्रमण असेल तर ते काढावे.

श्री.गजानन बारवाल :तत्कालीन आयुक्त यांनी एप्रिल-२०१५ दरम्यान महापालिकेच्या सर्व मालमत्तांना एक प्रचलित दर निश्चित केले होते. त्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. असे असतांना राजीव गांधी मैदान भाड्याने देणेसाठी रु.११ हजार दर लावावे असे आहे. त्यास आता रु.१ लक्ष पर-डे भाडे दर लावण्याचा प्रस्ताव श्रीमती मुथा मॅडम यांनी ठरविले. परंतु हा प्रस्ताव स्थगित करावा व जे भाडे दर निश्चित केले आहे त्याप्रमाणे तो भाडे लावावे.

मा.महापौर :प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.फेरोज खान :संस्थान गणपती ते एमजीएम रस्त्यातील अतिक्रमण काढणेस वर्ष लागले. त्या संदर्भात अनेक मिळकतधारक टीडीआर व मोबदल्यासाठी चकरा मारत आहे. श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी काही संचिका मंजूर केल्या होत्या. त्यानंतर श्रीमती मुथा मॅडमकडे संचिका गेल्या. त्यावर त्यांनी रिमार्क केले. या संदर्भात मी पत्र दिले होते. १०० लोकांना टीडीआर देणेसाठी कबूल केले होते. टेक्नीकल अधिकारी नगर रचना विभागात द्यावे. काही संचिका पुणे येथे तपासणीसाठी पाठविल्या गेल्या. किती दिवसात कार्यवाही होईल? सांगावे.

मा.आयुक्त :नवाबपूरा ते मोंढानाका व चमन चौक ते चंपाचौक रस्त्याचे बाबतीत बोलले होते परंतु या रस्त्यातील एका अतिक्रमणामूळे कार्यवाही करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

श्री.फेरोज खान :नवाबपूरा ते मोंढानाका रस्त्यावर एक इल्लिगल इमारत आहे. ती धोकादायक असतांना कार्यवाही होत नाही. नोटीस दिली, कार्यवाही नाही. कुणाच्या सांगण्यावरून कार्यवाही होत नाही? त्यापूढे काही लोकांनी परवानगी घेऊन इमारती बांधल्या. ताबा देत नाही. अनेकांनी अतिक्रमण करून शेड केले. चमन चौक ते चंपाचौक पर्यंत रस्त्याचे काम होत नाही. हिन्दी विद्यालयाची जागा मनपाने दान दिली. तेच आता मनपास कम्प्लीशन मागत आहे. त्यांची जुनी संचिका श्री.एस.एस.कुलकर्णी यांचेकडे आहे. त्या रस्त्यातील टपरी हटविले पुढील कार्यवाही होत नाही. संस्थान गणपती ते एमजीएम रस्त्याचे टीडीआर संचिका मा.आयुक्तांनी मंजूर केल्या. पुन्हा ती संचिका नगर रचनाचे अधिकारी श्रीमती मुथा यांचेकडे गेल्या. त्यांनी रिमार्क दिले हे योग्य नाही.

मा.आयुक्त :तेथे अतिक्रमणाचा विषय आहे. तसेच नगररचना विभागाचे संबंधीत टीडीआरचा विषय आहे. बाकी विषय जुना चौकशीचा वगैरे आहे. त्याचे सॉर्टआऊट करणेसाठी श्री.डी.पी.कुलकर्णी यांना सांगितले आहे. माहिती घेतली जाईल. प्रत्यक्ष त्या ठिकाणी व्हिजीट केली जाईल.

श्री.फेरोज खान :कधी व्हिजीट करणार आहे? मी ही उपस्थित राहिल तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. अधिकारी जागेवर भेटत नाहीत. व्हिजीटला कोणी येत नाही.

मा.आयुक्त :मी स्वत: पाहणी करील योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :सहा.संचालक नगर रचना विभागाचे अधिकारी कोण आहे? ते सभागृहात का येत नाही?

मा.आयुक्त :हजर राहण्यासाठी सुचना दिली होती. ते आले नाही. खुलासा मागवतो.

मा.महापौर :दिनांक १० रोजी सकाळी ९ वाजता हिन्दी विद्यालय जवळील रस्त्याची पाहणी केली जाईल.

विषय क्रमांक-५५१:- (समांतर जलवाहिनी पुनरुज्जीवन करण्यासंदर्भातील विषयावर झालेली चर्चा)

श्री.राजू शिंदे :समांतर जलवाहिनी या महत्वाच्या विषयासाठी सभा आयोजित केली. सर्व स.पदाधिकारी यांची या विषया बाबत काय भुमिका आहे? ते स्पष्ट करावे. मा.आयुक्तांची भुमिका काय आहे? ते सांगावे.

मा.महापौर :सभागृह जे मत मांडेल त्यासोबत आम्ही आहोत. सभागृहाची भुमिका मांडल्यानंतर महापौर निर्णय देत असतात.

श्री.दिलीप थोरात :समांतर बाबत महापौर बंगल्यावर काय चर्चा झाली? ते सांगावे.

मा.महापौर :कंपनीचे अधिकारी यांनी सांगितले की, मा.आयुक्त यांच्याकडे जो प्रस्ताव दिला तो स्वयंस्पष्ट आहे. त्यावर आपण विचार करावा.

श्री.राजू शिंदे :प्रशासनाने प्रस्ताव ठेवला त्यांचे मत घ्यावे त्यानंतर स.पदाधिकारी, मा.महापौर यांनी त्यांचे मत व्यक्त करावे.

श्री.नाईकवाडी अब्दुल :पत्र देऊन मी माहिती मागीतली होती दिली जात नाही. महाराष्ट्र टाईम्स् पेपरला होते की, समांतर बद्दल बाहेर सेटलमेन्ट करू शकत नाही. हा प्रस्ताव दिला कुणी? कंपनीने काही अटी शर्ती दिल्या होत्या. त्यातील काही अटी शर्ती काढण्यात आल्या. लेटर हेडवर हे दिले नाही. ज्यांनी ऑथेन्टीक लेटर दिले त्यांचा कुठेही पत्ता व प्रुफ नाही.

मा.महापौर :प्रशासनाने प्रस्ताव दिला आहे. लेखी प्रस्ताव आहे. त्यांची भुमिका दिली आहे.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती अंकिता विधाते :माझे वॉर्डात घाण पाणी येते. (दुषीत पाण्याची बॉटल दाखवितात.)

श्री.दिलीप थोरात :दुरूस्तीसाठी ठेकेदार बील देत नाही म्हणून काम करीत नाही.

मा.महापौर :दुषीत पाण्याचे सर्व प्रश्न सोडवावे.

कार्य.अभियंता-श्री.कोल्हे:काम सुरू केलेले आहे. रिपोर्ट आलेला आहे.

मा.महापौर :नवीन टेंडर बाबत चर्चा झाली सीएसआर एसएसआरच्या फरकामुळे ठेकेदाराचे दर निश्चित होत नाही. त्यासाठी या सर्वच कामाच्या बाबतीत प्रशासनाच्या माध्यमातून स्थायी समितीला प्रस्ताव ठेवावा निर्णय घ्यावा. विशेष बाब म्हणून मंजूर करावे.

श्रीमती अंकिता विधाते :सिमेंट रस्ते होत आहेत. सिमेंट पाईप टाकले जात आहे. पुन्हा रस्ते फोडून पाईप टाकणार काय?

श्री.राजेंद्र जंजाळ :डीएसआरचे रेट ३५ टक्केने कमी झाले. महापालिकेने पाईप खरेदीचे वेगळे टेंडर काढावेत. ठेकेदाराला लेबर चार्जेसवर पाईप टाकण्याचे काम द्यावे. प्रत्येक वॉर्डातील संचिका प्रलंबीत आहे. ठेकेदार काम करीत नाहीत. जास्त दराने निविदा भरली तर अधिकारी मंजूर करीत नाही. महापालिकेने पाईप खरेदी करावे. ठेकेदाराला लेबर चार्जेसवर काम द्यावे.

श्री.राजू शिंदे :समांतर एजन्सीचे काम बंद केले तेव्हा त्या एजन्सीकडून फारोळा येथे असलेले २० गाड्यात पाईप आणले होते. ते पाईप कुठे वापरले? दुषीत पाण्याचा प्रश्न सोडविता आला असता. माझ्या माहिती प्रमाणे ते पाईप ठेकेदाराला दिले. त्यांचे

पैसे अधिकारी यांनी घेतले व तेच पाईप ठेकेदाराने ६७-३-सी मध्ये वापरात आणून काम केले. डीसी व बील तपासले तर त्या ठेकेदाराने केलेले कामाचे पाईप कोणत्याही कंपनीतून आणलेले नाही. असे दिसून येईल. रु.३ ते रु.३.५० कोटीचे ते पाईप होते. याची चौकशी करावी. जुलै-ऑगस्ट-२०१६ मध्ये पाईप आणले होते. ते कुठे वापरात आणले?

मा.महापौर :समांतरला टर्मीनेट केले तेव्हा पाईपचा असलेला स्टॉक होता. त्याची चौकशी करण्याचे सांगितले होते चौकशी केली नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :हा गंभीर विषय आहे असे झाले असेल तर गुन्हे दाखल करावे. अधिकारी, ठेकेदाराकडून पाईपची वसुली केली पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :जे प्रस्ताव या सभेसाठी येतात. ते मा.आयुक्त यांच्या सहीने प्रस्ताव आले पाहिजे. अतिरिक्त आयुक्तांच्या सहीने येऊ नये. इतर सह्याचे अधिकार अतिरिक्त आयुक्तांना दिले. प्रस्ताव आणण्याचे ही अधिकार दिले का?

मा.आयुक्त :अतिरिक्त आयुक्त यांना अधिकार दिलेले आहेत. पॉलीसी डिसीजन असेल तर तेच माझे मान्यतेसाठी येते. यापूढे जे प्रस्ताव असतील माझे मान्यतेने येतील.

श्री.राजू शिंदे :केबलसाठी परवानगी देतो. नंतर रस्ते खोदले जाते. पुन्हा ते काम करून देत नाही. आता असे रस्ते खोदण्याची परवानगी देऊ नये असे पत्र दिले तरी एका ठेकेदाराला वार्डात रस्ते खोदणेसाठी परवानगी दिली गेली. रु.४८ लक्ष भरले परंतु वार्डात रु.५ कोटीचे नुकसान होणार आहे. अशा परवानगी देऊ नये.

मा.महापौर :श्री.डी.पी.कुलकर्णी येथे नाहीत. त्यांनी ती संचिका हाताळलेली आहे ते आल्यानंतर मा.आयुक्तांनी चर्चा करून घ्यावी. योग्य निर्णय घ्यावा.

श्रीमती मनीषा मुंढे :माझ्या वार्डात ड्रेनेजचे दुषीत पाणी वाहते संचिका गहाळ झाल्याचे सांगतात. १८ महिने झाले काम होत नाही.

कार्य.अभीयंता :संचिका तपासणी करून घेतली जाईल.

श्रीमती वाडकर :दोन महिन्यापासून शंभुनगर व सहकारनगर भागात पाणी येत नाही. माहिती देऊनही कार्यवाही होत नाही.

कार्य.अभियंता :योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. लाईनमनची तक्रार आहे. माहिती घेऊन कार्यवाही करतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :जो ठराव आला त्या बाबतीत प्रश्न आहे. या कंपनीच्या कामाच्या बाबतीत प्रशासनाने ठराव आणला होता की, समांतरचे काम चांगले नाही. काम बंद करावे. पुन्हा ठराव येतो की रद्द केलेला ठराव पुनरूज्जीवन करावे परंतु समांतरचा करारनामा रद्द करतांना सदस्यांनी जे प्रश्न मांडले होते पाणी पुरवठ्याचे असतील समांतरचे जे माईलस्टोन ठरविले,मीटर बसविणेचे असतील या बाबतीत प्रशासनाने काय अभ्यास केला? माहिती द्यावी.

मा.महापौर :इतर प्रश्न आहे समांतरवर नंतर चर्चा करण्यात येईल.

**<u>चर्चा:-</u>**

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्डात कचरा टाकला जातो. त्यावर प्रक्रिया होत नाही. पोलीस यंत्रणा घेऊन वार्डात कचरा आणून टाकला जातो. नागरीकांना त्रास होत आहे. इतर

वार्डातील कचरा आणून टाकू नये. नागरीकांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहे.

श्री.रावसाहेब आमले :कचरा डम्पींग होतो आहे. त्यावर प्रक्रिया होत नाही. इतर वार्डातीलही कचरा येतो. तो बंद करावा. नसता पुन्हा नागरीकांचा विरोध होईल व मिटमिटा येथे जशी परिस्थिती निर्माण झाली त्याप्रमाणे होईल.

श्री.चेतन कांबळे :रस्ते तयार झाले पाहिजे. घरकुल झाले पाहिजे. ते होत नाही परंतु नागरीकांची संमती नसतांना आमच्या भागात कचरा आणून टाकत आहे. नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. ऑलरेडी कत्तलखाना तेथे आहे. पुन्हा कचरा डेपो करीत आहे. हे योग्य नाही. टाकलेला कचरा उचलला जात नाही. कचरा डेपोसाठी जागा घ्यावी. त्यावर कचरा टाकावा. नागरीकांवर गुन्हे दाखल होत आहे योग्य नाही. सामाजिक सभागृह मागतो. तर रेडीरेकनरचे रेट लावले जातील असे सांगतात. गुंठेवारी मंजूर करीत नाही दलित वसाहतीत विकास करायचा नाही. उलट तेथे कचरा आणून टाकणार. हे योग्य नाही.

श्री.सुभाष शेजवळ :वार्ड क्र.१४ हा राखीव आहे. तेथे एसटीपी प्लॅन्ट आहे. कचरा डेपो आहे. कत्तलखाना आहे. इतर कारखाने याच वार्डातच का आहे? दुर्गंधी वाढत आहे. कचरा आता डम्प होतो. कचरा डेपो आमच्या वार्डात होऊ नये कचरावर प्रक्रिया केली तर कचरा टाकावा.

श्रीमती मनीषा लोखंडे :कत्तलखानासाठी राखीव जागा आहे. तेथे कचरा टाकतो आहे. हे योग्य नाही नसता आम्ही उपोषणास बसू. कचरा डेपो होऊ नये.

श्री.चेतन कांबळे :त्या भागात बौध्द लेणी आहे, सोनेरी महल आहे, विद्यापीठ आहे, गोगाबाबा टेकडी आहे.

मा.महापौर :महापालिकेच्या मिळकती भाड्याने देणे संदर्भात मतभिन्नता आहे. नवीन धोरण निश्चित करायचे आहे. मा.आयुक्त त्यात लक्ष घालतील. चांगला निर्णय होईल. घरकूल योजनेची कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :पडेगाव येथील लोकांना त्रास होणार नाही. आढावा घेतला आहे. मशीन लावणार आहे. बायोकल्चरल स्प्रे केला जाईल व कुत्र्यांमूळे त्रास होऊ नये सुचना दिलेल्या आहे. प्रत्येक वार्ड कचरा विल्हेवाट लावण्यास सक्षम झाले तर सेन्ट्रलाईज करण्याची वेळ येणार नाही. अनेक लोक कचरा रोडवर टाकतात. पीरबाजार येथे कचरा वर्गीकरण होतो आहे. प्रोसेसींग प्लॅन्ट नियोजित करावयाचे आहे. कत्तलखाना याचे ही आधुनिकीकरण करावयाचे आहे त्यासाठी बैठक घेणार आहे.

श्री.रावसाहेब आमले :कचरा आणतात,तो झाकून आणत नाही रोडवर कचरा पडतो.

श्री.चेतन कांबळे :कचरा डेपो कुठे असला पाहिजे?

मा.महापौर :कचरा प्रकरणात मा.न्यायालयात प्रकरण चालू होते मा.विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कमेटी होती त्या नुसार पाच स्पॉट केले. त्यात चिकलठाणा, पडेगाव, रमानगर, हर्सुल, कांचनवाडी असे आहे. जागेवर कचऱ्याचे सेग्रीकेशन करून कार्यवाही करणार आहे. प्रयत्न करून येथपर्यंत आलो. अनेक कचरा जनरेट झाला आहे. पाच महिन्यात ७०-७५ हजार टन कचरा जनरेट झाला

आहे. हर्सुलला विरोध होता होता तेथे लोकांची मानसिकता बदलावी लागली. मशीनरी लावून कचरा विल्हेवाट होईल. रमानगर येथे ही कचरा टाकत आहोत. पडेगावला टाकतो. मुद्दामहून टाकतो असे नाही. मशीनरी खरेदी करणेची कार्यवाही होत आहे. जकातनाका येथील दुर्गंधी कमी झाली आहे. ट्रीटमेन्ट करतो आहे. कांचनवाडीला कचरा टाकू नका विरोध होता. परंतु तेथेही कचरा टाकतो. कुठेही कचरा डम्प केला तर प्रोसेसींग होईल.

श्री.चेतन कांबळे :पडेगावला कचरा टाकणार असेल तर तेथील नागरीक विरोध करणारच आहे. ते आंदोलन करतील.

मा.महापौर :सभा तहकूब करण्यात येते. सभेची तारीख नंतर कळविण्यात येईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **स्वाक्षरित/-** |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |